CMYK

बीड । मंगळवार
१०.०६.२०२५
वर्षे : ५ अंक : ७०
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 



# आ संदीप क्षीरसागर विरोधात योगेश क्षीरसागर रस्त्यावर उतरले !



## महायुतीचे नेते एकवटले; रस्त्यावर उतरत आमदारांचा केला विरोध !

**▪ मंजूर झालेली कामे; ▪ आमदाराकडून अडवणूक; ▪ सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी भयभीत ▪ तात्काळ दखल न घेतल्यास रस्ता रोको पाठीमागे घेणार नसल्याची भूमिका !**

**बीड । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूक पूर्व दोन्ही क्षीरसागर मध्ये वार पलटवार पाहायला मिळाला होता. आमदार संदीप क्षीरसागर यांनी डॉक्टर योगेश क्षीरसागर यांचा निसटता पराभव केला. राज्यात महायुतीचे सरकार आले डॉक्टर योगेश क्षीरसागर यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून ताकद देण्याचे काम ही होत आहे. स्थानिक पातळीवर बीड तालुक्यातील ग्रामीण भागातील विविध विकास कामे वरिष्ठ पातळीवरून मंजूर करण्यात आली आहे. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदरील कामांचे मार्क आउट होत नसल्याने महायुतीचे पदाधिकारी आक्रमक झाले आहेत. आमदार संदीप क्षीरसागर यांच्या विरोधात रस्त्यावर उतरत घोषणाबाजी करण्यात आली आहे. कामे अडवणाऱ्या आमदाराला वरिष्ठ पातळीवरून समज देण्याची मागणी करण्यात आली असून सार्वजनिक



बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दमदाट करत कामे न करू देण्याचा आरोप महायुतीच्या पदाधिकाऱ्याकडून करण्यात येत आहे. विशेष म्हणजे या रस्ता रोकोला राष्ट्रवादीचे युवा नेते डॉक्टर योगेश क्षीरसागर यांनी उपस्थिती दर्शविल्याने बीडमध्ये पुन्हा क्षीरसागर विरोधात क्षीरसागर उभे राहणार आहे का ?

तालुक्यातील ग्रामीण भागातील नाळवंडी, पालीसह इतर जिल्हा परिषद गटातील ग्रामीण रस्त्यांची कामे आ.संदीप क्षीरसागर यांनी अडविल्याचा आरोप करत अनेक गावचे सरपंच, पदाधिकाऱ्यांनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोमवारी (दि.९) सकाळी ११ वाजता लक्षवेधी धरणे आंदोलन सुरू केले आहे.

हे आंदोलन राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, नाळवंडीचे सरपंच अ‍ॅड. राजेंद्र राऊत,भाजपचे जिल्हा सचिव शांतीनाथ ▶▶ उर्वरित पान २ वर

# शिवकृपे साठी माऊली दादा प्रमाणे भक्ती करावी: प. पूज्य प्रदीप मिश्राजी

**चाकरवाडी । प्रतिनिधी**

शिव अनंत शिव कृपा अनंत शिवाला शरण या आयुष्यात सुखी आनंदी राहण्यासाठी शिव महादेवाला शरण या, शिव भोलेबाबा खूप दयाळू आहेत. आयुष्यात दुःख कमी करून सुखी जीवन जगण्यासाठी भोले बाबांची भक्ती महत्त्वाचे आहे ज्ञानेश्वर माऊली दादा यांनी महादेवाची भक्ती करून सुखी जीवन जगले त्यामुळे माऊली दादा प्रमाणेच शिवकृपेसाठी भक्ती करा असे प्रबोधनपर विचार प. प्रदीप मिश्राजी यांनी मांडले. विसाव्या शतकातील महान संत संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या ▶▶ उर्वरित पान २ वर



# वेळप्रसंगी शिवसैनिक सत्ताधारी आमदार व मंत्र्यांनच्या गाड्या फिरु देणार नाहीतः जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

**बीड । प्रतिनिधी**

पक्षप्रमुख उध्दव साहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना सचिव विनायकजी राऊत साहेब,संपर्कनेते सुनिलजी प्रभूसाहेब , विरोधी पक्षनेते अंबादासजी दानवे साहेब व संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली 'क्या हुआ तेरा वादा' या मोहिम अंतर्गत आज बीड तालुक्यातील कोल्हारवाडी गावात शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर व ▶▶ उर्वरित पान २ वर



# श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे बुधवार रोजी केशव म.चावरे यांचे कीर्तन



**बीड । प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान संत किसनबाबा यांच्या २७ व्या वर्षातील दहावी पुण्यतिथी जेष्ठ शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प.केशव महाराज चावरे अण्णा वारकरी मंडळ मराठवाडा अध्यक्ष यांचे बुधवार दि.११ जून २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत ▶▶ उर्वरित पान २ वर




# शेतकऱ्यांची कर्जमाफी करुन मराठवाड्याला समन्यायी पाण्याचे वाटप झाले पाहिजे: भाई जयंत पाटील

## मराठवाड्यात नवीन युवकांना काम करण्याची संधी मिळणार

**केज । प्रतिनिधी**

मराठवाडा सातत्याने दुष्काळी झळा सहन करत असतो, तर पश्चिम महाराष्ट्र सह इतर काही भागात महापुरामुळे गावेची गावे पाण्याखाली येतात. वास्तविक मराठवाड्याचे हक्काची समन्यायी पाण्याची मागणी अनेक दिवसांपासून असताना देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे काही लोक केवळ मराठवाड्याला सम न्यायी पाणी करण्याच्या केवळ वल्गाणा करून मराठवाड्यातील जनतेला वेड्यात काढण्याचे काम करत आहेत ही बाब शेतकरी कामगार पक्ष कदापी खपवून घेणार नाही तर ▶▶ उर्वरित पान २ वर



● केजध्ये शेतकरी कामगार पक्षाच्या विभागीय मेळाव्याच नियोजन कमी वेळात मोहन गुंड टिमणे केलं याचं कौतुक पक्षाच्या वरिष्ठांनी केले, सर्वांशी संपर्क असणाऱ्या मोहन गुंड यांना पक्षाने जबाबदारी द्यावी आस कार्यकर्ते बोलून दाखवत होते, त्यामुळे लवकरच मोहन गुंडवर जिम्मेदारी पडेल कालच्या मेळाव्यातुन दिसून आले.

# शेतकऱ्यांना शासनाने दिलेले वादे निष्फळ झाल्यामुळे क्या हुआ तेरा वादा: शिवसेना आंदोलन करणार



**परळी वै. । प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांना दिलेले वादे ( आश्वासन) निष्फळ झाल्यामुळे शासनाला परळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने तीव्र आंदोलन करणार असल्याचे निवेदन परळी वैजनाथ येथील तहसील कार्यालय येथे देण्यात आले. शिवसेना पक्षप्रमुख महाराष्ट्राचे लाडके माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे युवासेना प्रमुख आमदार आदित्य ठाकरे यांच्या आदेशावरून शिवसेना मराठवाडा संपर्क नेते आमदार सुनील जी प्रभू साहेब शिवसेना विरोधी पक्षनेते अंबादासजी दानवे शिवसेना उपनेते प्रवक्ता प्रा, सुषमाताई अंधारे शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख ▶▶ उर्वरित पान २ वर

# नाळवंडी ग्रामस्थांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन



## रोजगार हमी, पंधराव्या वित्त आयोगाच्या बोगस कामांची चौकशी करण्याची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील नाळंडी येथे रोजगार हमी योजना आणि पंधराव्या वित्त आयोगाच्या आणि जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत अनेक बोगस कामे झालेली आहेत. सरपंच, ग्रामसेवक आणि शासकीय अधिकारी यांनी संगनमत करून मोठा भ्रष्टाचार केलेला आहे. याबाबत वारंवार तक्रार करूनही प्रशासन याची दखल घेत नसल्याने सोमवार (दि.९) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करून झालेल्या बोगस कामांची चौकशी करण्याची मागणी केली.

रोजगार हमी योजना, पंधरावा वित्त आयोग आणि जिल्हा वार्षिक योजनेच्या कामासंदर्भात नाळवंडी गावात अनेक गैरप्रकार झाले आहेत. रोजगार हमी योजनेतून अगोदरच झालेली कामे दाखवून, कामांची नावे बदलून नाळवंडी ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक आणि शासकीय अधिकारी यांनी लाखोंचा अपहार केला आहे. बोगस कामे करत शासनाची आणि जनतेची मोठी फसवणूक केली आहे. याबाबत नाळवंडी गावचे ▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK

# उपसभापती मोरे नाना यांचेवर शुभेच्छांचा वर्षाव; वाढदिवसानिमीत्त सर्वच क्षेत्रातील मान्यवरांकडुन सत्कार



**माजलगाव । प्रतिनिधी**

बहुजन विकास मोर्चाचे नेते, माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, बाबुराव पोटभरे यांचे खंदे समर्थक श्रीहरी नाना मोरे यांच्या वाढदिवसानिमीत्त राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील सर्वच मान्यवरांकडुन शुभेच्छांचा वर्षाव झाला तर दिवसभर सत्कार व सोशल मिडीयावरही शुभेच्छांचा धुमाकुळ दिसुन आला अनेकांनी भावी जिल्हा परिषद सदस्य म्हणुन देखील शुभेच्छा दिल्या. सर्वसामान्यांच्या कुठल्याही कामात अपेक्षेविना तुमचं काम होउन जाईल असं बोलन व ते काम करून घेण हा स्वभाव असल्याने जिल्हाभरात उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांच्या चाहत्यांमध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. लोक कमवणारा नेता, समाजात देखाव्यासाठी मोठेपणा न करता बहुजन, वंचित, उपेक्षित व सर्वच जाती धर्मातील लोकांच्या कामांना न्याय देण्यासाठी झटणारे मोरे नाना आज लोकप्रिय झाले आहेत. समाजात तुमचं असणारं प्रामाणिक कामं, अन्यायाविरूध्द लढणारा निडर स्वभाव, राजकारणातील भुमिका अशी वैशिष्टे श्रीहरी नाना मोरे यांची आहेत. दि. ७ जुन रोजी वाढदिवसानिमीत्त दिवसभर त्यांचे ठिकठिकाणी सत्कार झाले तर दिवसभर देखील तरूणांसह सर्वच जाती धर्मातील लोकांची त्यांच्या निवासस्थानी ये – जा होती. अनेकांनी भावी जिल्हा परिषद सदस्य म्हणुन देखील मोरे नाना यांना शुभेच्छा दिल्या.

पुरूषोत्तमपुरी, सादोळा, केसापुरी, फुलेपिंपळगाव, गंगामसला, खरात आडगाव, कल्याणनगर, लवुळ, राजेवाडी, पुरूषोत्तमपुरी सह तालुक्यातील अनेक गावातील लोकांनी यथोचित सत्कार करत नानांप्रती असलेले प्रेम व्यक्त केले तर किट्टी आडगावात तरूणांनी तर कार्यक्रम घेवुन सत्कार केला. यात राजकीय नेते, कार्यकर्ते, पत्रकार, डॉक्टर, वकील, सर्व स्तरातील सर्व जाती धर्मातील प्रतिष्ठीत नागरिकांनी शुभेच्छा देण्यासाठी व सत्कारासाठी मोठी गर्दी केली होती त्याचबरोबर बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांनी देखील पत्राव्दारे मोरे नाना यांना शुभेच्छा दिल्या.

पान १ वरून पुढे...

## आ संदीप क्षीरसागर...

डोरले यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर, माजी नगरसेवक अमर नाईकवाडे, युवा नेते महेश धांडे, भाजप राज्य कार्यकारिणी सदस्य डॉ. लक्ष्मण जाधव, महात्मा फुले बुवा दलाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. सतीश शिंदे, भाऊसाहेब डावकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवकचे बीड तालुकाध्यक्ष नंदकुमार कुटे, पंचायत समितीचे माजी सदस्य उत्तरेश्वर सोनवणे, युवासेना जिल्हाप्रमुख सुमित कोळपे, अरुण लांडे, प्रदीप गायकवाड, सरपंच धनेश्वर खेत्रे, दत्ता जाधव, रोहित जाधव, सिद्धार्थ जाधव, राजाभाऊ नवले, लकी कंडेरे, राजू टाक, सुमंत राऊत, नामदेव म्हेत्रे, सखाराम राऊत, सचिन उनवणे यांच्यासह अनेकजण सहभागी झाले होते. ॲड. राजेंद्र राऊत यांनी म्हटले की, आ. संदीप क्षीरसागर यांच्या दबावतंत्रामुळ अधिकारी रस्त्याचे मार्कआऊट देत नसून रस्त्याचे काम रखडले आहे. त्यामुळे आमदारांसह अधिकाऱ्यांचा निषेध करण्यासाठी आंदोलन करत असल्याचे सांगितले. बीड तालुक्यातील नाळवंडी, पालीसह इतर जिल्हा परिषद गटातील नाळवंडी ते मौज व्ही. आर.क्र. २४३ काळेगाव हवेली ते लमाण तांडा रस्ता व्ही. आर. ३५४, ओडीआर ५० ते मानकुरवाडी रस्ता व्ही. आर. ३७, पाली ते वरवटी इजिमा १२७, पाली ते वरवटी इजिमा १२७ यांसह इतर अनेक रस्ते सुधारणा अंतर्गत कामे आहेत. सदर रस्ते हे जिल्हा नियोजनमधून सन २०२४ या वर्षामध्ये मंजूर आहेत. सदर रस्त्याचे कार्यारंभआदेश ६ महिन्यांपूर्वी झालेले आहेत. या रस्त्याचे काम सन २०२४ मध्ये जिल्हा नियोजन समितीमार्फत मंजूर झाले असून, डिसेंबर २०२४ मध्ये कामाचे कार्यारंभ आदेश निघाले आहेत. मात्र, बीडमधील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंता, उपअभियंत्यांकडून अद्यापही कामाचे मार्कआऊट देण्यात आलेले नाहीत. आ. संदीप क्षीरसागर यांना ज्या भागातून अल्प मतदान झाले, त्या त्या भागातील कामे थांबवण्यात येत असल्याचा आरोप सरपंच ॲड. राऊत यांनी केला आहे. यापूर्वीही त्यांनी अनेक विकासकामात खोडा घातला, परंतु यापुढे त्यांची मनमानी सहन केली जाणार नाही, त्यांच्याविरोधात वेळोवेळी आवाज उठविला जाईल, असा इशाराही ॲड. राऊत यांनी दिला आहे. दरम्यान, मागण्यांचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांना देण्यात आले. यावेळी बीड तालुक्यातील अनेक गावचे सरपंच, पदाधिकारी, ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. आमदार संदीप क्षीरसागर विरोधात माहितीचे नेत्यांनी धणे आंदोलन केल्याने बीड तालुक्यात महायुतीचे पदाधिकारी व आमदार संदीप क्षीरसागर आमने सामने आले असून या महायुतीचे नेतृत्व डॉक्टर योगेश क्षीरसागर यांच्याकडे असल्याने बीड तालुक्यात पुन्हा आमदार संदीप क्षीरसागर विरोधात डॉक्टर योगेश क्षीरसागर असा सामना रंगणार आहे का ?

पान 3 वरून पुढे...

## तीस वर्षांनी...

सुदर्शन खोड यांनी आपल्या आठवणींना उजाळा देत, शाळेचा ऋणानुबंध शब्दबद्ध केला. त्यांच्या मनोगतातून बालपणाचे क्षण, शिक्षकांचा प्रभाव, आणि एकत्र घालवलेला काळ जिवंत झाला.

आम्हाला शिकवणाऱ्या सर्व मान्यवर शिक्षकांचा यथोचित सत्कार करण्यात आला. या वेळी त्यांना विशेषतः तयार केलेली स्मृतिचिन्हे व आकर्षक भेटवस्तू देऊन कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून सन्मानित करण्यात आले.यानंतर शिक्षकांमधून श्री मराडे सर आणि श्री झेड एन सानप सर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत, जीवनाचे धडे, मूल्यांची जपणूक आणि पुढील वाटचालीसाठी प्रेरणादायी विचार मांडले. अध्यक्षीय समारोप करताना मा. गो. गो. मिसाळ सरांनी शाळेच्या वाटचालीचा आढावा घेत, १९९६ बॅचच्या एकतेचा व कौतुकाचा विशेष उल्लेख केला. परिचय सत्र – आठवणींच्या प्रवाहात पुन्हा एकदा हरवलेले आपण कार्यक्रमातील एक अत्यंत भावस्पर्शी आणि खास भाग होता – विद्यार्थ्यांचा परिचय सत्र. प्रत्येक विद्यार्थ्याने आपला ओळखपर परिचय दिला आणि त्या क्षणांतून ३० वर्षांनंतर प्रत्येकाच्या आयुष्यात घडलेले बदल, वाटचाल, संघर्ष आणि यशाचं चित्र उलगडत गेलं. कधी हशा आला, कधी डोळे पाणावले पण सर्वांच्या मनात एकच भावना ठासून राहिली – आपण अजूनही तेच आहोत, फक्त वेळ पुढे गेला!

तास पुन्हा सुरू – ३० वर्षांनी वर्गात परतले विद्यार्थी– कार्यक्रमातील एक खास भाग म्हणजे – मुलांचे पुन्हा विद्यार्थी होणे!

अभ्यासक्रम नव्हता, पण शिकण्याची तयारी होती. श्री शिंदे सरांनी भूगोल शिकवला, श्री मराडे सरांनी मराठी, श्री तांबडे सर आणि श्री एन व्ही सानप सरांनी हिंदी, श्री नागरगोजे सरांनी खेळाचे तास घेतले. हे सर्व क्षण अत्यंत हसतखेळत, जणू काही कालच विद्यार्थिदशा संपली होती अशा आनंदात पार पडले. मराडे सरांचा मराठीचा तास सुरू होता... वर्गात पुन्हा एकदा त्या जुन्या काळासारखं शांत, शिस्तबद्ध वातावरण होतं. सगळे जण विद्यार्थ्यांच्या भूमिकेत मनापासून रमले होते. तेवढ्यात वर्गाच्या दाराशी घोडके मामा दिसले – त्यांच्या हातात होती एक छोटीशी, पण खूप मोठं भावविश्व उलगडणारी नोटीस. मराडे सरांनी ती नोटीस वर्गासमोर वाचून दाखवली. क्षणभर सगळ्यांचे लक्ष मराडे सरांच्या शिकवणीकडून त्या नोटीसकडे वळलं आणि मन नकळत मागे फिरलं – ३० वर्षांपूर्वीच्या त्या आठवणींत.

ती नोटीस म्हणजे केवळ कागदाचा तुकडा नव्हता, ती होती त्या काळाच्या आठवणींची साक्ष.सगळं जसंच्या तसं होतं... जणू काळ थांबला होता. जेवणात होती चव आठवणींची, स्नेहाची आणि संगतीची

गेट–टुगेदरच्या दिवशी शाळेच्या प्रांगणात एकत्र जेवणाची सुंदर व्यवस्था करण्यात आली होती. या वेळी शाळेच्या पटांगणात पुन्हा एकदा सगळी बॅच एकत्र होती – एकाच ताटात जेवण करण्यासाठी.

पंगती लावल्या गेल्या आणि पुढ्यात आले रुचकर, गरमागरम जेवणाचे पदार्थ. पण खरं सांगायचं तर, त्या पोळ्या, भाजी, चटणीपेक्षा चव होती ती एकत्र बसण्यात, हसण्यात , आणि 'जरा भाजी दे रे' म्हणण्यात होती.एकेक करून सगळे जागा घेत होते... कोणीतरी आपल्या जुन्या

पान १ वरून पुढे...

## शिवकृपे साठी...

२५ व्या पुण्यस्मरणानिमित्त रौप्य महोत्सवी सोहळा आयोजित करण्यात आला आहे. याप्रसंगी प्रदीप जी मिश्रा बोलत होते. यावेळी लाखो भाविकांनी संत ज्ञानेश्वर माऊली यांचा जयघोष केला या जयभूषण आख्खी चाकरवाडी नगरी दुमदुली. यावेळी बोलताना प्रदीप मिश्राजी म्हणाले की, मनुष्याला दुःख कष्ट कमी करण्यासाठी शिवाला शरण जाणे, शिव महादेवावर प्रखर विश्वास व श्रद्धा ठेवणे गरजेचे आहे. शिव भोलेबाबा सारखा दयाळू कृपाळू दाता या विश्वात कोणी नाही. शिवाची कृपा करून घेण्यासाठी श्रद्धेने भक्ती करणे गरजेचे आहे श्रद्धा असेल तर कोणतीही बघतीस सफल होते. भक्ती करत असताना देवावर विश्वास ठेवणे गरजेचे आहे. नामस्मरण केल्याने अशक्य ते शक्य होते. त्यामुळे महादेवासारख्या दयाळू देवावर भक्ती करा. माऊली दादांनी महादेवावर भक्ती केली, नामस्मरण केले आणि आपले आयुष्य सुखी समाधानी केले. दुःख पासून मुक्ती मिळविण्यासाठी माऊली दादांसारखी भक्ती करावी असे आवाहन ही शिवमहापुराण कथेत परम पूज्य प्रदीप मिश्राजी सिहोर वाले यांनी शिवमहापुराण कथेत केले. दरम्यान बीड जिल्ह्याच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेले माऊली दादाची चाकरवाडी नागरी नामस्मरनाणे दुमदुमली महापूजा, काकडा आरती, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, शिवमहापुराण कथा, हरिपाठ, शिव सहस्रनाम, विष्णू सहस्रनाम, अभंगवाणी संगीत भजन, संकीर्तन, भारुड हरिजागर या चोवीस तासांत हरिनाम नामस्मरणाने माऊली दादाची चाकरवाडी दुमदुमली असून भाविकांचा ओघ वाढत आहे. या कथेस लाखो भाविकांची उपस्थिती होती. विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत ज्ञानेश्वर माऊली दादा यांच्या पंचविसाव्या पुण्यस्मरणार्थ रौप्यमहोत्सवी सोहळा तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली चाकरवाडी येथे विविध कार्यक्रम नियोजनाप्रमाणे पार पडत आहे. तरी भाविकांनी या कथेचा अखंड नाम सप्ताहाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## वेळप्रसंगी शिवसैनिक...

तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी शेतकरी व सर्वसामान्य लोकांशी संवाद साधला व त्यांची बाजू समजून घेतली व याच ठिकाणी छोट्या बैठीकीचे रुपांतर मोठ्या सभेत झाले, यावेळी सर्वसामान्य लोकांचा सरकारच्या विरोधातील रोष बघायला मिळाला यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर म्हणाले की ,भाजप व शिंदे शिवसेना व अजित पवार यांच्या महायुतीचे सरकार हे लोकांना फसव्या घोषणा करून सत्तेत आलेले आहे, सत्ता मिळवण्यासाठी यांनी अशक्य असणाऱ्या योजना जाहीर केल्या व आता यांना ते करणे शक्य नसल्याने लोकांना काय सांगावं या विवेचनेत ते अडकले आहेत , यामुळे महाराष्ट्राचा विकास रखडला आहे, अत्यावश्यक कामाला

पान ४ वरून पुढे...

मित्रासोबत जेवत होतं, कोणीतरी शिक्षकांबरोबर गप्पा मारत होतं. जेवण हे निमित्त होतं मनं पुन्हा एकत्र येण्याचं. आयुष्यात आजपर्यंत अनेक पंगती अनुभवल्या, हॉटेलात, लग्नात, ऑफिस कॅन्टीनमध्ये... पण या जेवणात नात्यांचा गोडवा होता, आठवणींचा स्वाद होता, आणि बालपणीचा सच्चेपणा. त्या क्षणी जाणवून गेलं – भूक पोटाची नव्हतीच, ती होती काळाच्या अंतरात हरवलेल्या मैत्रीची* आणि ती आज भरून आली! स्मृतिचिन्ह वितरण – एक कृतज्ञतेचा क्षण भोजन समारंभानंतर कार्यक्रमातील एक विशेष आणि स्मरणीय क्षण अनुभवण्यास मिळाला.१९९६ च्या बॅचमधील सर्व विद्यार्थ्यांना खास तयार करण्यात आलेल्या स्मृतिचिन्हांचे वितरण करून सन्मानित करण्यात आले.या स्मृतिचिन्हांद्वारे केवळ उपस्थितांची नोंद झाली नाही, तर त्यांचं शाळेशी असलेलं भावनिक नातं आणि ऋणभावही अधिक दृढ करण्यात आला. हे क्षण केवळ कार्यक्रमापुरते मर्यादित राहिले नाहीत, तर कॅमेरात आणि उपस्थितांच्या अंत:करणात कायमचे कोरले गेले. या स्मृतिचिन्हांचा आशय होता –आपण या शाळेचे विद्यार्थी होतो, आहोत आणि कायम राहू... हा सन्मान केवळ भूतकाळातील नव्हे, तर भावी नात्यांचीदेखील साक्ष आहे. मनमोकळ्या क्षणांची मैफल– स्मृतिचिन्हांचे वितरण झाल्यानंतर अंताक्षरी, डमशिरास, गप्पागोष्टी, गाणी, शाळेतील जुन्या आठवणी अशा विविध उपक्रमांनी मैफल रंगली. कधी दिवस सरला कळलंच नाही! असा प्रत्येकाच्या चेहऱ्यावरचा भाव होता. कार्यक्रमाची सांगता आणि कौतुक– कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली. हा क्षण अत्यंत भावनिक होता. अनेकांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळत होते. ही केवळ शाळा नव्हती, आमचं दुसरं घर होतं, अशा भावना अनेकांनी व्यक्त केल्या. या कार्यक्रमाचे नियोजन, समन्वय, संवाद आणि अंमलबजावणीसाठी सर्व सहकार्यांनी प्रचंड मेहनत घेतली. त्यांच्या संयोजन कौशल्याचे उपस्थितांनी मुक्तहस्ते कौतुक केले. अशा स्मरणरंजनाने मनात रुजलेली नाळ अधिक घट्ट होते. १९९६ च्या बॅचचा हा गेट–टुगेदर याचे उत्तम उदाहरण ठरला. आता सर्वांनी एकच निर्धार केला – पुढचं गेट–टुगेदर इतकं लांब नको आता दर २ वर्षांनी तरी शाळेत परत यायचं! (शब्दांकन – प्रविण सुभद्राझुंबर सानप.)

## दलित महासंघाच्या शह...

युवाशक्तीला चळवळीचे केंद्रबिंदू बनवत राज्यात अन्याय, अत्याचार विरोधात खंबीरपणे साथ देणाऱ्या दलित महासंघाच्या संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक मच्छिंद्र सकटे यांच्या मार्गदर्शनाखाली मसू पवार यांची शहर जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. या निवडीचे सर्व स्तरातून पवार यांचे अभिनंदन होत असून मातंग समाजाचे युवा नेते व भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती जमाती महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष अनिल चांदणे यांच्या वाढदिवसानिमित्त प्राध्यापक मच्छिंद्र सकटे यांनी अनिल चांदणे यांना शुभेच्छा दिल्या असून मसू पवार यांना पुढील कार्यास दलित महासंघाच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## ना.अजितदादांनी...

शहरात पाणी साठवणूक करण्यासाठीही व्यवस्था झाली आहे. त्याबद्दल बीड शहरवीसीयांच्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांनी

पान १ वरून पुढे...

यांच्याकडे पैसे नाहीत,याचाच जवाब विचारण्यासाठी क्या हुआ तेरा वादा हे ब्रीदवाक्य घेऊन आम्ही उद्धव साहेबांच्या आदेशानुसार गावागावात फिरून यांच्या खोट्या जाहीर केलेल्या घोषणांचा पर्धापाश करिता आहोत या शासनाने दिलेली आश्वासने जर पाळली नाहीत तर येणाऱ्या काळात सत्ताधारी मंत्री व आमदार, खासदार यांच्या गाड्या आम्ही फिरु देणार नाहीत व हया शासनाला चले जाव चार इशारा देण्यात येईल असे ताकीद शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी विविध ठिकाणी बोलताना दिला आहे. यावेळी तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघण तालुका सचिव नंदकुमार येवले , सहसचिव संदिप भानप ,युवा नेते ज्ञानेश्वर सिंघन , नंदकुमार इंगोले,रुईदास अप्पा रांजवण ,अशोक जाधव , बिभिषण शेंडगे , भिमराव जाधव, सिताराम काजळे , त्रिंबक पवार ,सातेराम पवार , दत्ता रांजवण ,नवनाथ चोरमले ,भगत घललाळ, भागवत जाधव , विश्वजीत जाधव , ओमराजे सिंघन , मुक्ता राम बेंगडे ,कुंडलिक सपकाळ , सिताराम जाधव , महादेव इंगोले , यांच्यासह गावातील शेतकरी, कामगार ,व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.शेवटी ज्ञानेश्वर सिंघन यांनी उपस्थित सर्वांचे अभार मानले.

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ...

कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी मानकुरवाडी यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

## शेतकऱ्यांची कर्जमाफी...

मराठवाड्याला समन्यायी पाणी वाटप झाल्याशिवाय शेतकरी कामगार पक्ष स्वस्थ बसणार नाही अशी घोषणा शेतकरी कामगार पक्षाचे नेते सरचिटणीस भाई जयंत पाटील साहेब यांनी केली. पक्ष बांधणी संदर्भात नवीन चेहऱ्यांना संधी देणार असल्याचे वक्तव्य जयंत पाटील यांनी बोलुन दाखवले. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते प्रा एस व्ही जाधव होते कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून पक्षाचे सहचिटणीस भाई बाबासाहेब देवकर, महिला आघाडीच्या ड मानसी म्हात्रे ,भाई बाबुरावजी लागारे ,चित्रलेखा गोळेगावकर नारायण गोले पाटील, भाई उदय गवारे, विष्णुपंत घोलप, ॲड गोविंद डुमणे, बाळासाहेब धस यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी, तुषार गोळेगावर ,किरण खपले, अमोल दिक्षीत, उत्तम अमृतराव, सुशिल सोमवंशी, राजाराम रसाळ, आसद बल्खी, शिवाजी सुरवसे, राजु सुरनर, यांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे प्रास्ताविक मेळावा समन्वयक भाई मोहन गुंड यांनी केले, सुत्रसंचलन हनुमंत घाडगे सर यांनी केले. तर

पान ४ वरून पुढे...

ना.अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत. बीड शहरातून बिंदुसरा नदी वाहते. परंतु गेल्या २५ वर्षांपासून या नदीच्या संवर्धनासाठी कसल्याही प्रकारचे काम झाले नव्हते त्यामुळे बीड शहर आणि तालुक्याची जलधारा असलेली बिंदुसरा नदीची अतिशय वाईट अवस्था झाली होती. बीड शहरात पावसाळ्याच्या काळात पुराचा धोका टाळण्यासाठी नदीची स्वच्छता होणे अत्यंत गरजेचे होते. ही बाब लक्षात घेऊन आ.संदीप क्षीरसागर यांच्या मागणीनुसार बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांनी तातडीने यंत्रणा उभी करून दिली. विशेष म्हणजे या महत्वाच्या कामासाठी कसलीही निविदा प्रक्रिया वगैरे वेळ लागणार्या प्रक्रियेतून न जाता आपल्या स्तरावरूनच ना.अजित दादांनी यंत्रणा कामाला लावली. ना.अजितदादांच्या निर्देशावरून २० मे २०२५ रोजी मा. जिल्हाधिकार्यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल प्रशासन, बीड नगरपालिका प्रशासन आदी कामाला लागले आणि बिंदुसरा नदीची स्वच्छता मोहीम सुरू झाली. गेल्या १७ दिवसांमध्ये अखंडितपणे नदीची स्वच्छता करण्याचे काम सुरू होते. शेवटी ना.अजित दादांमुळेच हे शक्य झाले. ना.दादांच्या सूचनेवरून शासकीय विभाग, विविध सामाजिक संस्था आणि प्रशासकीय यंत्रणा यांनी जोमाने काम करत बिंदुसरा नदीला अस्वच्छतेच्या विळख्यातून बाहेर काढले. बिंदुसरा नदीची स्वच्छता झाल्यामुळे गेल्या आठवड्यात पूरपरिस्थीती निर्माण होण्यासारखी अतिवृष्टी झाल्यानंतरही बीड शहराला पूराचा धोका झाला नाही. सोबतच बिंदुसरा धारणाच्या मोठ्या चादरीवरून पाणी वाहीले तरीही बीड शहरात कुठेही पाणी शिरले नाही. ही अतिशय मोठी आणि समाधानकारक बाब आहे. यापुढील काळातही बीब शहराला बिंदुसरा नदीच्या स्वच्छतेमुळे पुराचा धोका अतिशय कमी झाला आहे. याबद्दल ना.अजिदादांचे बीडकर कायम ऋणी असतील अशी भावना आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केली.

## बेरोजगारीवर मात...

आपल्या आईवडिलांचे स्वप्न साकार करावेत सार्वजनिक संपत्तीचे व पर्यावरणाचे रक्षण करावे शिस्तबद्ध लष्कर व सुसंघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी एक सामर्थ्यशाली व प्रागतिक राज्य उभे केले छत्रपती शिवाजी महाराजांनी आपली स्वतःची अशी युद्धनीती विकसित केली जी गनिमी कावा म्हणून ओळखले जाते. कार्यक्रमात कुमारी शिवकन्या सौंदनकर हिने आपल्या ऑन–जॉब ट्रेनिंगचा अनुभव शेअर करत आपल्या भावना व्यक्त केल्या. श्री प्रबोधन निकाळजे यांनी सोशल मीडियापासून दूर राहून युवकांनी कौशल्य शिक्षणाकडे लक्ष देण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री श्रीधरपंत सहस्त्रबुद्धे यांनी शिवराज्याभिषेकाचा इतिहास सांगत त्याचा सण म्हणून महत्त्व विशद केले. त्यांच्या मनोगताच्या शेवटी त्यांनी स्वदेशी वस्तू वापरण्याचा प्रेरणादायी संदेश दिला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थितांनी तंत्र प्रदर्शनाला भेट देत प्रशिक्षणार्थ्यांनी तयार केलेल्या विविध प्रकल्पांचे कौतुक केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयटीआयचे प्राचार्य श्री गणेश हडतगुणे यांनी केले तर सूत्रसंचालन एम. जी. पवार सर यांनी प्रभावीपणे पार पाडले. या कार्यक्रमाला अनेक मान्यवर उपस्थित होते त्यामध्ये

पान १ वरून पुढे...

आभार प्रा उमाकांत राठोड यांनी केले. अशोक रोडे ॲड निखिल बचुटे मुंजा पांचाळ मंगेश देशमुख यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

## शेतकऱ्यांना शासनाने...

परशुराम जाधव साहेब शिवसेना बीड जिल्हा सह संपर्क नेते बाळासाहेब अंभोरे शिवसेना बीड जिल्हा लोकसभा प्रमुख सुनील दादा धांडे सर यांच्या सूचनेवरून शिवसेना उपजिल्हाप्रमुख नारायणरावजी सातपुते शिवसेना परळी माजी उपनगराध्यक्ष भाऊराव भोईटे शिवसेना तालुकाप्रमुख भोजराज पालीवाल शिवसेना शहरप्रमुख राजेश विभुते युवा सेना जिल्हाध्यक्ष सोमनाथ गीत्ते महिला आघाडी तालुका संघटक प्रमिलाताई लांडगे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांना शासनाने दिलेले वादे ((आश्वासन) शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देणार, शेतकरी सन्मान योजनेतून पंधरा हजार रुपये देणार,, लाडक्या बहिणीला पंधराशे रुपयाचे २१०० रुपये देणार ४५ हजार गावात बांधन रस्ते बांधणार,, शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या खतावरील जीएसटी अनुदानाच्या स्वरूपात परत करणार,, एक रुपया पिक विमा,, वृद्ध पेन्शन धारकांना २१०० रुपये देणार,, अन्नदाता बनेल ऊर्जा दाता,, शेतीला २४ तास वीज बिल,, शेतमालाला हमी भाव देणार,, बी बियाणे खतांच्या किमती नियंत्रणात ठेवू,, घर घर जल––हर घर छत, मराठवाडा वॉटर ग्रीड केंद्राकडून मान्यता घेऊ,, आशाप्रकारचे वादे (आश्वासन) शासनाने शेतकऱ्यांना दिले होते ते निष्फळ झाल्यामुळे क्या हुआ तेरा वादा परळी तहसील समोर शिवसेना शेतकऱ्यांना घेऊन तीव्र आंदोलन करणार असे निवेदन देण्यात आले आहे यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख नारायणराव सातपुते शिवसेना तालुकाप्रमुख भोजराज पालीवाल शिवसेना माजी उपनगराध्यक्ष शिवसेना शहर प्रमुख राजेश विभुते युवा सेना जिल्हाध्यक्ष सोमनाथ गीत्ते शिवसेना महिला आघाडी तालुका संघटक प्रमिलाताई लांडगे शिवसेना उपतालुकाप्रमुख महेश केंद्रे शिवसेना तालुका सचिव प्रकाश साळुंके विजय जाधव राहुल उपाडे हरीश पालीवाल इत्यादी आजी–माजी पदाधिकारी व शिवसैनिक यावेळी उपस्थित होते .

## नाळवंडी ग्रामस्थांचे...

माजी सरपंच राधाकिशन म्हेत्रे आणि ग्रामस्थ यांनी वारंवार तक्रारी केल्या आहेत. परंतु यावर प्रशासनाकडून कसल्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही. अनेक वेळा निवेदने, तक्रारी देऊनही कारवाई होत नसल्याने नाळवंडी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. सदरील कामांचे कोणतेही बील अदा करण्यात येऊ नये. सदरील कामांची सखोल चौकशी करून याप्रकारामध्ये सहभागी असलेल्या सरपंच, ग्रामसेवक आणि शासकीय अधिकारी यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. अशी मागणी यावेळी नाळवंडी गावच्या आंदोलनकर्त्या नागरिकांनी केली आहे.

पान ४ वरून पुढे...

नगराध्यक्ष जिया बेग नगराध्यक्ष, माजी नगराध्यक्ष श्री रंगनाथ धोंडे, श्री अशोक जीबकाटे, ॲड. प्रबोधन निकाळजे, श्री अक्षय शिरस्वाल, श्री कैलास रेडेकर, श्री गणेश शिंदे, श्री गौतम आजबे, श्री विनोद रोडे,श्री सुनिल सानप, श्री नितेश कर्डुले, सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिजाऊ ज्ञान...

शिक्षक राम वराट सर, शिक्षिका रेणुका मॅडम, ॲडमिशन प्रोसेस मध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल. शाळेचे संस्थापक गणेश घुमरे सरांनी सर्व शिक्षक वृंद शिंदे सर, देवकते सर, जाधव सर, साळवे सर, चव्हाण सर, काळे मॅडम, जाधव मॅडम, यांचे कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या... यावेळी गणेश सरांनी गरीब परिस्थितीतील १५ हुशार विद्यार्थ्यांना या वर्षीपासून मोफत शिक्षण देण्याची तरतूद केली आहे. असा नव संकल्प आजच्या या शालेय प्रवेशाच्या दिनी सरांनी जाहीर केलेला आहे... तरी सर्व जागरूक पालकांनी पाल्याचा प्रवेश आपल्या पाल्याचा सर्वांगीण विकास घडवणाऱ्या जिजाऊ ज्ञान मंदिर इंग्लिश स्कूलमध्ये करावा. आणि पाल्याचे उज्वल भवितव्य घडवावे. अतिशय आनंददायी वातावरणामध्ये शालेय प्रवेश दिन उत्साहात संपन्न झाला.

## अवकाळी पावसाने....

साडे ३ एकर कांद्याची लागवड करण्यात आली.जवळपास रोपं,बि बियाणे,खत, फवारणी आदि २ लाख रुपयांच्या वर खर्च झालेला आहे. अवकाळी पावसाने काही कांदा शेतातच सडला तर काढुन झाकुन ठेवलेला कांदा पाण्याखाली गेला आणि तो काळपट पडला आहे तर काही कांद्याला कोंब फुटले आहेत. सध्या चांगल्या कांद्याला १५ रुपये पर्यंत भाव आहे.मग या काळपट पडलेल्या कांद्याला कोण विचारणार? सरकारचे धोरण चुकीचे आहे.त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही आणि दुष्काळात तेरावा महिना म्हणल्याप्रमाणे अवकाळी पाऊस आणि महसूलचे अधिकारी पंचनाम्यासाठी फिरकत नाहीत आता तुम्हीच सांगा शेतकऱ्यांनी कसं जगायचं असा उद्विग्न सवाल लिंबागणेश येथील कांदा उत्पादक शेतकरी कल्याण भालचंद्र वाणी यांनी डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना केला. कृषीमंत्री जिथं ढेकळाचे पंचनामे करायचे का? म्हणत असतील तर महसूल प्रशासन पंचनामे कसे करणार??:– डॉ.गणेश ढवळे

गेल्या आठवड्यात सिन्नर तालुक्यात अवकाळी पावसाने झालेल्या पिकांच्या नुकसानीची पाहणी करताना शेतातुन बाहेर काढुन ठेवलेल्या कांद्याचे पंचनामे करण्यात येऊन नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केल्यानंतर असंवेदनशील कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी काढलेल्या पिकांचे पंचनामे करून काय करायचे? ढेकळाचे पंचनामे करायचे का? असा सवाल शेतकऱ्यालाच विचारला.तसेच शेतात पडलेल्या कांद्याचे पंचनामे करायचे हे नियमात बसत नाही असे म्हणत शेतकऱ्यांबद्दल सहानुभूती पुर्वक विचार करण्याची मानसिकता नसल्याचे दाखवून दिले.त्यामुळे महसूल प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी पंचनामे करायला कशाला पुढाकार घेतील असा संतप्त सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी विचारला आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# तीस वर्षांनी पुन्हा भरली शाळा: भगवान विद्यालय बीड येथे १९९६ बॅचचा गेट-टुगेदर उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार

**बीड । प्रतिनिधी**

शाळा म्हणजे फक्त शिक्षण देणारी इमारत नसते, ती असते आठवणींचं गाठोडं, आपुलकीचा ओलावा, आणि शालेय मित्रमैत्रिणींसोबत घालवलेल्या निरागस दिवसांचा एक अमूल्य ठेवा. याच आठवणींना उजाळा देण्यासाठी भगवान विद्यालय, बीड येथे १९९५-९६ च्या बॅचचा गेट-टुगेदर आयोजित करण्यात आले होते. तब्बल ३० वर्षांनंतर पुन्हा एकदा विद्यार्थ्यांनी आपल्या लाडक्या शाळेची पायरी ओलांडली, आणि वातावरणात भावनांचा, आनंदाचा, गप्पांचा ओघ दरवळून गेला.




या कार्यक्रमाचे आयोजन सर्व १९९६ बॅच च्या माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने पार पडले. अध्यक्षस्थानी मा. श्री. गो. गो. मिसाळ सर (कार्याध्यक्ष, भगवान विद्या प्रसारक मंडळ) हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. झेड. एन. सानप (संस्थाध्यक्ष) यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. शाळेचे सर्व माजी शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि जवळपास ५५ विद्यार्थी मोठ्या उत्साहाने उपस्थित होते.

शिक्षकांचे औक्षण - आदराची आणि कृतज्ञतेची अमूल्य सावली

कार्यक्रमाची सुरुवात ठीक सकाळी ८ वाजता झाली. ३० वर्षांपूर्वी आपल्याला ज्ञानदान करणाऱ्या, घडवणाऱ्या प्रत्येक शिक्षकांचे औक्षण करताना डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. ही केवळ औपचारिकता नव्हती - ती होती मन:पूर्वक व्यक्त केलेली कृतज्ञता. आज आम्ही थोडे यशस्वी झालो असलो, तरी मूळ संस्कारांचे बीज पेरणारे तेच गुरुजन होते - म्हणून त्यांच्या चरणी त्यांचे औक्षण करून आभारांची परंपरा जपली.

राष्ट्रगीतानंतर स्व. भा. वा. सानप सरांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या पूजनाच्या माध्यमातून शाळेच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या स्व. भा. वा. सानप सरांप्रती श्रद्धांजली अर्पण करण्यात आली आणि त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करत कार्यक्रमाचा प्रारंभ झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी, आम्हा सर्वांना घडवणाऱ्या आणि आज आपल्यात नसलेल्या स्वर्गीय शिक्षकांना तसेच आयुष्यात विविध टप्प्यावर साथ दिलेल्या, पण आज काळाच्या पडद्याआड गेलेल्या आमच्या प्रिय सहपाठी मित्रांना - सर्वांना द्रव अंतःकरणाने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ही श्रद्धांजली म्हणजे केवळ एक परंपरा नव्हे, तर आमच्या मनातील कृतज्ञता, सन्मान आणि आठवणींचा उजाळा होता.

सहकारी मित्र राजेश गदळे याने अतिशय ओघवत्या शैलीत आणि भारदस्त आवाजात सूत्रसंचालन करून सर्व उपस्थितांचे मन जिंकले. कार्यक्रमाची प्रस्तावना सहकारी मित्र अजय शेरकर याने अत्यंत प्रभावी शब्दांत सादर केली. त्याने कार्यक्रमाच्या उद्देशाला सुस्पष्ट स्वरूप देत उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण केले.

विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून अरुण पवार, अरुणा राठोड, जगदीश वाघमारे आणि ▶▶ **उर्वरित पान २ वर**

# गरजू विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी संस्थेच्या जिल्हानिहाय कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा: सेवा सहयोग संस्थेचे आवाहन

आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मदत करणाऱ्या सेवा सहयोग संस्थेच्या विद्यार्थी विकास योजनेतून गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शिष्यवृत्ती स्वरूपात मदत दिली जाते. दहावीमध्ये ९० टक्के, बारावीत ७० टक्के आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेत चांगल्या दर्जाच्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळतील इतके गुण मिळवणारे गरजू विद्यार्थी या योजनेत मदत मिळण्यास पात्र ठरतात. संबंधित विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी संस्थेच्या जिल्हानिहाय कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. संपर्क यादीची लिंक खाली दिली आहे.

सेवा सहयोग संस्थेच्या विद्यार्थी विकास योजनेच्या कार्याचा परिघ दिवसेंदिवस विस्तारत आहे. ठाण्यात सुरू झालेल्या या उपक्रमातून गेल्या १७ वर्षात ३६ जिल्ह्यातील २ हजार ३९६ विद्यार्थ्यांना २७ कोटी ३१ लाख रूपये शिष्यवृत्ती स्वरूपात देण्यात आले. २०२४-२५ या आर्थिक वर्षात १ हजार ३१ विद्यार्थ्यांना संस्थेने ६ कोटी २५ लाख रूपये शिक्षणासाठी मदत केली. या १४ वर्षात संस्थेने ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील आठ शाळा इमारतीच्या पुनर्निर्माणासाठी ७ कोटी ५९ लाख रूपये उपलब्ध करून दिले आहेत. समाजातील नव्या पिढीतील गुणवत्तेला न्याय देण्याचा प्रयत्न करणाया या उपक्रमात नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेचे संस्थापक रविंद्र कर्वे यांनी केले आहे. महाराष्ट्रासह उत्तरप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेश, गुजरात, केरळ, छत्तीसगड, मध्यप्रदेश, राजस्थान आणि झारखंड या राज्यात ही शैक्षणिक चळवळ पोहोचली आहे. 'टीजेएसबी' बँकेचे सीईओपदावरून निवृत्त झाल्यावर रविंद्र कर्वे यांनी समविचारी मित्रांसह ठाण्यात २००८ मध्ये विद्यार्थी विकास योजना संस्थेची स्थापना केली. वर्षांगणिक संस्थेची व्याप्ती वाढत आहे. ६२३ देणगीदार आणि ५०० शुभचिंतकांच्या सहकार्याने संस्थेचे कार्य सुरू असून या उपक्रमाद्वारे मार्च अखेरपर्यंत ३४ कोटी ९० लाख रूपयांचा निधी शैक्षणिक कार्यासाठी संकलीत झाला आहे. संस्थेच्या मदतीने शिक्षण पूर्ण करून नोकरी लागलेल्या माजी विद्यार्थ्यांनी बांधिलकी मानून आतापर्यंत ६३ लाख ५७ हजार रूपये संस्थेकडे सुपूर्द केले आहेत. संस्थेच्या एकुण निधी संकलनात माजी विद्यार्थ्यांचे सध्याचे योगदान दोन टक्के असले तरी ते भविष्यात वाढत जाणार आहे.

## संस्थेची ठळक वैशिष्ट्ये

- गुणवत्ता आणि गरज हे संस्थेतर्फे दिल्या जाणाया मदतीचे निकष असून त्याचे काटेकोरपणे पालन केले जाते.
- संस्थेकडून मदत मिळालेल्या विद्यार्थ्यांमध्ये ५४ टक्के मुले आणि ४६ टक्के मुली आहेत.
- संस्थेकडून शिष्यवृत्ती मिळविलेले ४३ टक्के विद्यार्थी शहरी, २० टक्के विद्यार्थी अर्धनागरी भागातून तर ३७ टक्के विद्यार्थी ग्रामीण परिसरातील आहेत.

अभियांत्रिकी, वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न साकार गरीब घरातील विद्यार्थी कितीही हुशार असला तरी पैशाअभावी क्षमता असूनही त्याला इंजिनियर अथवा ड़ॉक्टर होता येत नव्हते. आता ही परिस्थिती बदलली आहे. संस्थेने मदत केलेल्या एकुण विद्यार्थ्यांपैकी ४० टक्के विद्यार्थी देशभरातील नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयातून इंजिनियरिंगचे शिक्षण घेत आहेत. २४ टक्के विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण घेत आहेत. राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात संस्थेचे विद्यार्थी आहेत. दहा टक्के नर्सिंग आणि पॅरामेडिकल, सात टक्के पदवी तर पाच टक्के विद्यार्थी पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत आहेत. आर्किटेक्चर, फॅशन डिझायनिंग, फार्मसी, आयसीडब्यूए, सीए, सीएस या अभ्यासक्रमांसाठीही विद्यार्थ्यांना संस्थेने शिष्यवृत्ती दिली आहे.

आतापर्यंत संस्थेच्या मदतीने १३६४ विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण झाले. एक हजार ३२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.संस्थेचे विद्यार्थी नामांकित कंपन्यांमध्ये संस्थेच्या मदतीने उच्च शिक्षण घेतलेले २६ माजी विद्यार्थी टाटा समूहातील कंपन्यांमध्ये नोकरी करीत आहेत. 'इन्फोसिस' आणि 'महिंद्रा अँन्ड महिंद्रा'मध्ये प्रत्येकी ११, 'एल अँन्ड टी'मध्ये सहा, 'कॅप्जेमिनी' मध्ये पाच तसेच 'टीजेएसबी' बँक,' सिप्ला',' एचएसबीसी', 'आयसीआयसीआय' आदी नामांकित कंपन्यांमध्ये संस्थेचे विद्यार्थी अधिकारीपदावर आहेत. आतापर्यंत एकुण ४८५ विद्यार्थी विविध आस्थापनांमध्ये नोकरीला लागले आहेत.

जिल्हानिहाय संपर्क यादीची लिंक
https://bit.ly/VVY-mentors

**- (रविंद्र कर्वे) संस्थापक, विद्यार्थी विकास योजना संचालक, सेवा सहयोग फाऊंडेशन**

## परिशिष्ठ ४

अवसायक (खालील तपशिलाप्रमाणे) संलग्न,
दि. बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. जि.बीड
दि. २६.०५.२०२५

मा. सहायक निबंधक, सहकारी संस्था ता. धारुर जि.बीड यांनी त्यांचे कार्यालयीन आदेशाव्दारे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ मधील तरतूदीन्वये खालील सहकारी संस्थेचे अंतिम आदेश निर्गमित केलेले असून त्यावर खालील तपशिलाप्रमाणे अवसायकांची नियुक्ती केलेली आहे. त्यानुषंगाने खालील सहकारी संस्थांची अवसायन कार्यवाही पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम १९६१ मधील नियम ८९ (४) मधील तरतूदीप्रमाणे खालील सहकारी संस्थांच्या सर्व संबधीतांना याव्दारे नोटीस देऊन कळविण्यात येते की, त्यांना संस्थेस देणे असल्यास अथवा संस्थेचे येणे असल्यास या नोटीसचे दिनांकापासून दोन (०२) महीन्याच्या आत त्यांचे येणे रक्कमेबाबत हरकती / आक्षेप पुराव्यानिशी संबधीत अवसायकाकडे दाखल करावे. आणि देणे रक्कम तात्काळ संबधीत अवसायकाकडे जमा कराव्यात वरील मूदतीत संस्थेचे देणे / येणे रक्कमांचे अनुषंगाने संबधीत अवसायकाकडे पुराव्यानिशी कागदपत्रे दाखल न केल्यास संस्थेस कोणचेही देणे नाही अथवा येणे नाही असे समजण्यात येऊन अवसायन कार्यवाही पूर्ण करण्यात येईल तसेच संस्थेच्या येणे असलेल्या रक्कमा संबधीत अवसायकाडे जमा न केल्यास त्या कायदयातील तरतूदीप्रमाणे वसूल करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी. मूदतीनंतर आलेल्या आक्षेपावर विचार केला जाणार नाही.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | अवसायकाचे नाव | अवसायनाचा अंतिम आदेश दिनांक | घेण्यात येणाऱ्या अंतिम सभेचा दिनांक व वेळे |
|---|---|---|---|---|
| १ | हुतात्मा काशिनाथ न. प. कर्म. स. प. म. धारुर | श्री एम. आर. गव्हाणे, जेष्ठ तपासणीस | १५/०१/२०१६ | ०४/०८/२०२५ सकाळी ०९.०० वा |
| २ | कै. डिगंबर जि. प्रे. सह. संस्था मर्या. आवरगाव | श्री एम. आर. गव्हाणे, जेष्ठ तपासणीस | १५/०१/२०१६ | ०४/०८/२०२५ सकाळी ११.३० वा |
| ३ | सेवा सहकारी संस्था मर्या. देवठाणा ता. धारुर जि. बीड | श्री. भारती पी.व्ही. तपासणीस | २४/११/२०१५ | ०४/०८/२०२५ सकाळी ०९.०० वा |
| ४ | सेवा सहकारी संस्था मर्या. कांदेवाडी ता. धारुर जि. बीड | श्री. भारती पी.व्ही. तपासणीस | २४/११/२०१५ | ०४/०८/२०२५ सकाळी ११.३० वा |
| ५ | सेवा सहकारी संस्था मर्या. चिखली ता. धारुर जि. बीड | श्री. भारती पी.व्ही. तपासणीस | २४/११/२०१५ | ०४/०८/२०२५ दुपारी ०२.०० वा |
| ६ | सेवा सहकारी संस्था मर्या. सुरणरवाडी ता. धारुर जि.बीड | श्री. भारती पी.व्ही. तपासणीस | २४/११/२०१५ | ०४/०८/२०२५ दुपारी ०४.३० वा |
| ७ | सेवा सहकारी संस्था मर्या. काटेवाडी ता. धारुर जि. बीड | श्री. भारती पी.व्ही. तपासणीस | २४/११/२०१५ | ०५/०८/२०२५ सकाळी ०९.०० वा |
| ८ | सेवा सहकारी संस्था मर्या. सिंगणवाडी ता. धारुर जि.बीड | श्री. भारती पी.व्ही. तपासणीस | २४/११/२०१५ | ०५/०८/२०२५ सकाळी ११.३० वा |
| ९ | सेवा सहकारी संस्था मर्या. कचारवाडी ता. धारुर जि. बीड | श्री. भारती पी.व्ही. तपासणीस | २४/११/२०१५ | ०५/०८/२०२५ दुपारी ०२.०० वा |
| १० | सेवा सहकारी संस्था मर्या. व्हरकटवाडी ता. धारुर जि. बीड | श्री. भारती पी.व्ही. तपासणीस | २४/११/२०१५ | ०५/०८/२०२५ दुपारी ०४.३० वा |
| ११ | सेवा सहकारी संस्था मर्या. फकीरजवळा ता. धारुर जि. बीड | श्री. भारती पी.व्ही. तपासणीस | २४/११/२०१५ | ०६/०८/२०२५ सकाळी ०९.०० वा |
| १२ | सेवा सहकारी संस्था मर्या. देवदहिफळ ता. धारुर जि. बीड | श्री. भारती पी.व्ही. तपासणीस | २४/११/२०१५ | ०६/०८/२०२५ सकाळी ११.३० वा |
| १३ | सेवा सहकारी संस्था मर्या. म्हातारगांव ता. धारुर जि. बांड | श्री. राठोड एस. आर. तपासणीस | २४/११/२०१५ | ०६/०८/२०२५ सकाळी ०९.०० वा |
| १४ | सेवा सहकारी संस्था मर्या. संगम ता. धारुर जि. बीड | श्री. राठोड एस. आर. तपासणीस | २४/११/२०१५ | ०६/०८/२०२५ सकाळी ११.३० वा |

तसेच वरील संस्थांच्या सर्व सभासद धनको, ऋणको यांना याव्दारे असेही सूचित करण्यात येते की, संस्थेची अवसायन कामकाजाची कार्यवाही पूर्ण करण्याच्या दृष्टीकोणातून अंतिम सभा त्या-त्या संस्थेच्या नावापुढे दिलेल्या दिनांक व वेळेस सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. धारुर येथे ठेवण्यात आलेली आहे. सदर सभेस संस्थांच्या सर्व सभासद,धनको, ऋणको, यांनी त्यांचे आक्षेप व पुराव्यासह हजर राहावे. सदर सभेमध्ये अवसायन कामकाजाचा अहवाल व संस्था नोंदणी रद्द करणेबाबतचा विचारविनिमय केला जाणार आहे यांची कृपया संबधीतांनी नोंद घ्यावी.

**(स्वाक्षरीत)**
**एम.आर.गव्हाणे,**
**जेष्ठ तपासणीस**
**जि.म.स. बँक, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**भारती पी.व्ही.**
**तपासणीस**
**जि.म.स. बँक, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**राठोड एस. आर.**
**तपासणीस**
**जि.म.स. बँक, बीड**

# वहाली जलजीवन योजनेतील अपूर्ण कामांची चौकशी करावी - शरद पवार

**पाटोदा । प्रतिनिधी**

तालुक्यातील वहाली गावातील जलजीवन योजनेचे काम अद्यापही अपूर्ण असून, या संदर्भात सखोल चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनी केली आहे.वहाली गावातील जलजीवन योजनेचे काम अनेक वर्षांपासून अर्धवट असल्यामुळे याबाबत वेळोवेळी तक्रार करूनही प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याने वहाली जलजीवन योजनेसाठी सरकारने लाखो रुपयांचा निधी मंजूर करूनही पाण्याचा थेंबही गावकऱ्यांच्या घरी पोहोचत नाही, हे अत्यंत दुःखद आहे. यामध्ये संबंधित कंत्राटदार, अभियंते आणि अधिकाऱ्यांची भूमिका तपासून योग्य ती कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी शरद पवार यांनी केली.

## मा. अॅड.अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बीड यांचे समोर

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, "मधुमीन", डॉ.हाटवटे बिल्डींग, प्रियदर्शनी बाल उद्यानच्या पश्चिमेस, राजीव गांधी चौक, नगर रोड, बीड ता.जि. बीड (मल्टिस्टेट को-ऑपरेटिव सोसायटीज अॅक्ट 2002 व अब्रिटेशन अॅन्ड कन्सिलेशन अॅक्ट अन्वये)

**जाहीर नोटीस / समन्स** — दि. 06/06/2025

अर्जदार : श्री. सिद्धराज अर्बन मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. माजलगाव ता.माजलगाव जि. बीड

**विरूद्ध - गैरअर्जदार**

1) लवाद अर्ज क्र. 01/2025 1. माने ज्ञानेश्वर नारायण 2. शारदा ज्ञानेश्वर माने दोघे रा. सुरूमगाव ता. माजलगाव जि. बीड 3. उद्धव बळीराम लोमटे रा. गुंज (खुर्द) ता. पाथरी जि. परभणी
2) ल. क्र. 04/2025 1. गणेश शंकर पांचाळ 2. रेखा गणेश माने 3. ज्ञानेश्वर नारायण माने तिघे रा. सुरूमगाव ता. माजलगाव
3) ल. क्र. 06/2025 1. शंकर आप्पाराव माने 2. सोमित्रा आप्पाराव माने 3. विश्वनाथ बाबुराव माने रा. सुरूमगाव ता. माजलगाव
4) ल. क्र. 07/2025 1. देशमुख मझहरपाशा सरफदआली 2. हीना मझहर देशमुख 3. जलाल मंजुर शेख रा. तालखेड ता. माजलगाव

(प्रत्येक प्रकरणात वर नमुद क्र. 1 हे कर्जदार तर अन्य जामीनदार आहेत.)

या नोटीस द्वारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूद्ध वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावनी नोटीस आपना पैकी काहीनी घेऊन गैरहजर राहिलात. काहीनी नोटीस घेण्यास नकार दिला. तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत / नाहीत. तसेच काहींच्या नोटीस तामील होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशी कामी आपण दि. 27/06/2025 रोजी सकाळी 11 वा. या लवाद न्यायाधिकरण कार्यालयात तुम्ही अथवा तुमच्या वकीलांन सह हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास या बाबत तुमचे काहीही म्हणने नाही असे समजून तुमच्या विरूद्ध लवाद अर्जाचा एकतर्फी हुकूम / अदेश करण्यात येईल. याची नोद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस / समन्स माझ्या सही व शिक्यांची दिले आहे.

अॅड.अजित एम. देशमुख
लवाद अधिकारी, बीड.

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ३९८ /२०२५**

अर्जदार- (१) राजेंद्र पि. अंबादास गिराम, वय- ५४ वर्षे, धंदा-शेती, रा. नाथापुर, ता. जि. बीड. २) पदमाकर पि. अंबादास गिराम, वय- ५२ वर्षे, धंदा-शेती, रा. नाथापुर, ता. जि. बीड. ३) द्वारकाबाई भ्र. अंबादास गिराम, वय ७९ वर्षे, धंदा घरकाम, रा. नाथापुर, ता. जि. बीड.

विरुध्द

**गैरअर्जदार :- निरंक**

**अर्जदार हे भारतीय आहेत**

**प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे अंबादास पि. रंगनाथ गिराम यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे **अंबादास पि. रंगनाथ गिराम, रा. नाथापुर, ता. जि. बीड हे दिनांक २५/०९/२०१४ रोजी नाथापुर, ता. जि. बीड** येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ व २ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क. ३ ही मयताची पत्नी आहे. मयत अंबादास पि. रंगनाथ गिराम यांचे आई वडील हे ब-याच वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पुढील दिनांक १५/०४/२०२५**

आज दिनांक ०७/०३/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**(अॅड. शेळके वाय. आर. यांच्या मार्फत)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)** **शिक्का**
**क.लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ओ. एन. मंत्री साहेब, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १३१३/२०२४**

**सुशिला प्र. राम मेहेत्रे व ईतर विरूध्द निरंक**

अर्जदार - १. सुशिला भ्र. राम मेहेत्रे, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा. पिंपळनेर ग. ता. जि. बीड, २. अशोक पि. राम मेहेत्रे, वय १९ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सदर, ३. पांडुरंग पि. राम मेहेत्रे, वय ११ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सदर, अ.पा.क. आई अर्जदार क. १, ४. मदनराव पि. नामदेव मेहेत्रे, वय ७९ वर्षे धंदा - शेती, रा. सदर

विरुध्द निरंक

**मागणी- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत राम पि. मदनराव मेहेत्रे,** यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत राम पि. मदनराव मेहेत्रे, यांचा मृत्यु दिनांक ११/०९/२०२३ रोजी झाला आहे. यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

१. मयत राम पि. मदनराव मेहेत्रे, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू राम पि. मदनराव मेहेत्रे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०५/०३/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०८/०४/२०२५ आहे.**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)** **शिक्का**
**क.लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती टी. ए. आसरकर ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज ३२८/२०२५**

**सारजा वगैरे विरुध्द निरंक**

अर्जदार :-(१) सारजा रामराव राऊत, वय ४० वर्ष, धंदा घरकाम, २) गोकुळ रामराव राऊत, वय ३३ वर्ष, धंदा शेती दोघे रा. नाळवंडी ता. जि. बीड

विरुध्द

**मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत..**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत रामराव बाबूराव राठत यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **मयत रामराव बाबूराव राउत यांचा मृत्यु दि. ०७/०६/२०२४ रोजी राहते नाळवंडी ता. जि. बीड** येथे झाला आहे. अर्जदार क्र. १ ही पत्नी असून अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा आहे. मयताचे आई वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत..

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत रामराव बाबूराव राउत यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७ माहे मार्च २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २५ मार्च २०२५.**

**(अॅड. शेळके वाय. आर. यांच्या मार्फत)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)** **शिक्का**
**क.लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा.श्री आर. जी. बागडे साहेब, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ३९९/२०२५**

**फरीदा विरूध्द निरंक**

अर्जदार- १. फरीदा भ्र. इस्माइल कुरेशी, वय ७६ वर्षे, धंदा घरकाम, रा. पिंपळनेर, ता. जि. बीड. २. जरीना भ्र. गौस कुरेशी, वय - ३३ वर्षे, धंदा- घरकाम, रा. सदर. ३. अल्तमाश पि. गौस कुरेशी, वय - १६ वर्षे, धंदा शिक्षण, अज्ञान अ.पा. क. आई अर्जदार क. २, रा. सदर. ४. दिशान पि. गौस कुरेशी, वय १४ वर्षे, धंदा शिक्षण, अज्ञान अ.पा. क. आई अर्जदार क. २, रा. सदर. ५. हुमेरा पि. गौस कुरेशी, वय १२ वर्षे, धंदा शिक्षण, अज्ञान अ.पा. क. आई अर्जदार क्र.२, रा. सदर.

**मागणी - बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत गौस पि. इस्माईल कुरेशी मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी **मयत गौस पि. इस्माईल कुरेशी यांचा मृत्यु दिनांक ३१/१०/२०२२** रोजी झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत गौस पि. इस्माईल कुरेशी यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत गौस पि. इस्माईल कुरेशी यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १०/०३/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १६/०४/२०२५ आहे.**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)** **शिक्का**
**क.लिपीक**

दैनिक मराठवाडा पत्र
epaper.marathwadapatra.com
मंगळवार, दि.१० जून २०२५ पान ४

## दलित महासंघाच्या शहर जिल्हाध्यक्षपदी मसू पवार; संस्थापक अध्यक्ष प्रा.मच्छिंद्र सकटे यांनी केली नियुक्ती

**बीड । प्रतिनिधी**


महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीत सक्रिय व आक्रमक असणाऱ्या दलित महासंघ या सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक मच्छिंद्र सकटे यांच्या आदेशाने बीड येथील सामाजिक कार्यकर्ते मसु पवार यांची दलित महासंघाच्या बीड शहर जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. यावेळी मातंग समाजाचे ज्येष्ठ नेते तथा दलित महासंघाचे सक्रिय कार्यकर्ते गोरख मोमिन यांची उपस्थिती होती. महाराष्ट्रात दलित महासंघाच्या माध्यमातून ▶▶ उर्वरित पान २ वर



# ना.अजितदादांनी सोडविला फास; बिंदुसरा नदीने घेतला मोकळा श्वास

# तब्बल 25 वर्षांनंतर बिंदुसरा नदी स्वच्छ झाली

## आ.संदीप क्षीरसागरांनी मानले ना.अजितदादांचे आभार





**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराची जलधारा असलेली बिंदुसरा नदीला आवळला गेलेला अस्वच्छतेचा फास ना.अजितदादांनी सोडविला आणि तब्बल २५ वर्षांनंतर बिंदुसरा नदीने मोकळा श्वास घेतला. ना.अजितदादांनी तातडीने बिंदुसरा नदी स्वच्छतेच्या कामासाठी तातडीने यंत्रणा उभी करून दिली. त्यामुळेच बिंदुसरा नदीची स्वच्छता करणे शक्य झाले आहे. बिंदुसरा नदीची स्वच्छता झाल्यामुळे बीड शहरात पुराचा धोका कमी झाला आहे. सोबतच बीड ▶▶ उर्वरित पान २ वर

**● जिल्हाधिकारी आणि सर्वच सहभागी यंत्रणांचेही आभार– आ.संदीप क्षीरसागर**

दि.२० मे रोजी बिंदुसरा नदी स्वच्छता आणि खोलीकरण कामाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर सलग आजपर्यंत १७ दिवसांच्या स्वच्छता मोहीमेत मा.जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक यंत्रणांनी सहभाग नोंदवला. नगरपालिका प्रशासन, महसूल प्रशासन, जायकवाडी पाटबंधारे विभाग यांच्यासह भारतीय जैन संघटना, जलसंपदा विभाग, नाम फाउंडेशन यांनीही स्वेच्छेने सहभाग घेतला होता. सर्वांच्या सहकार्यामुळेच बिंदुसरा नदीचे स्वच्छताकाम पूर्णत्वास जाऊ शकले. याबद्दल मा.जिल्हाधिकारी आणि बिंदुसरा नदीच्या स्वच्छता मोहीमेत सहभागी झालेल्या सर्व यंत्रणांचे आ.संदीप क्षीरसागर यांनी आभार व्यक्त केले आहेत.





*बीड: तालुक्यातील मौजे ईट येथील गंगानाथवाडी शिवारातील गेल्या शंभर वर्षांपासून रस्ता असताना देखील रस्त्यावर कुपट्याचे फास टाकून अडवण्यात आला आहे. रस्ता मोकळा करून द्यावा यामागणीसाठी नायब तहसीलदार हजारे साहेब यांना निवेदन देताना सखाराम नरनाळे, गोरख नरनाळे, तात्याभाऊ नरनाळे, दिगंबर नरनाळे, दिपक भोसले, गायके मामा आदी ईट येथील नागरिक निवेदन देताना उपस्थित होते.*

## बेरोजगारीवर मात करण्यासाठी तरुणांनी कौशल्य रोजगाराचे शिक्षण घेऊन उद्योजकते कडे वळावे: आ.सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**



तरुणांनी नोकरीपेक्षा कौशल्य रोजगार उद्योजकता विकास उपक्रमांचा अभ्यास करून व्यवसाय सुरू करावेत असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले आष्टी येथील श्री गुरुलिंग स्वामी जिबकाटे शासकीय तंत्रनिकेतन येथे शिवराज्याभिषेक दिन साजरा करताना प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते.यावेळी रा.स्व. संघाचे जेष्ठ कार्यकर्ते श्रीधर सहस्त्रबुद्धे, रा.स्व. तालुका संघचालक कैलास रेडेकर प्राचार्य गणेश हडतगुणे उपस्थित होते या कार्यक्रमाचे ऑनलाईन उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व्हिडीओद्वारे करण्यात आले. तसेच, मा. श्रीमती मनीषा वर्मा (अप्पर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग) यांनी कार्यक्रमाला शुभेच्छा संदेश पाठवून उपस्थितांचे उत्साहवर्धन केले.

आ. सुरेश धस पुढे म्हणाले, बेरोजगारीच्या समस्येवर कौशल्य शिक्षण हाच उपाय असल्याचा प्रभावी संदेश दिला. त्यांनी युवकांना व्यवसायाच्या दिशेने वाटचाल करण्याचे आवाहनही यावेळी केले. शिवराज्याभिषेक दिन फक्त साजरा न करता छत्रपती शिवाजी महाराजांच्या विविध गुण युवकांनी आपल्या अंगी उतरवावेत प्रामाणिकपणे शिक्षण घेऊन ▶▶ उर्वरित पान २ वर

## उपळी येथे वडवणी पोलिसांचा छापा, ४०० किलो गोवंश जातीचे मांस जप्त



**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी पोलीस ठाणे हद्दीमध्ये उपळी या गावात एक इसम गोवंश जातीचे जनावरांची कत्तल करीत असल्याची गोपनीय माहिती वडवणी प्रभारी वर्षा व्हगाडे यांना मिळाली. त्यांनी तात्काळ मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी छापा मारला असता तेथे फिरोज सिकंदर कुरेशी वय ३५ वर्ष, राहणार उपळी हा त्याचे घरामध्ये गोवंश जातीची जनावरे कत्तल करताना मिळून आला. पोलिसांनी घटनास्थळावरून ८० हजार रुपये किमतीचे ४०० किलो वजनाचे गोवंश जनावरांचे मांस, लोखंडी सुरे व लाकडी ओंडका जप्त केला. सध्या आरोपी अटकेत असून पुढील तपास सहाय्यक फौजदार विष्णू जायभाये करत आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत व अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांचे मार्गदर्शनाखाली वडवणी पोलीस ठाण्याच्या सहायक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे, पोलीस उपनिरीक्षक राजू राठोड, संदीप चव्हाण, पोलीस अंमलदार विष्णू खरात, किरण इरमले, वसंत करे यांनी केली.

## जिजाऊ ज्ञान मंदिर इंग्लिश स्कूलमध्ये शालेय प्रवेश दिन उत्साहात संपन्न

**ह. भ.प. शांतिब्रह्म नवनाथ बाबा यांनी शाळेला भेट दिली व पुढील या शैक्षणिक वर्ष च्या वाटचालीस शुभेच्छा व आशीर्वाद दिले**





**घाटसावळी । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे भवितव्य उज्वल व्हावे त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून लावलेल्या एका रोपट्याचं आज वटवृक्षात रूपांतर झालेल आहे.. यासाठी शांतीब्रह्म नवनाथ बाबा यांचे शुभाशीर्वाद आणि मार्गदर्शन ही नेहमी आमच्या शाळेला लाभत असतं. शाळेमध्ये नवीन आलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच व्हाईस प्रिन्सिपल म्हणून नियुक्त झालेले हरी घुमरे सर यांचे सर्व शिक्षकांच्या वतीने स्वागत करण्यात आले. व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या... यावेळी नव्याने रुजू झालेले ▶▶ उर्वरित पान २ वर

## महायुती सरकारच्या फसव्या योजना जनतेसमोर उघड करा: आ. कैलास पाटील



**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कळंब धाराशिव चे आमदार मा. कैलास पाटील यांनी आज जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या संपर्क कार्यालयास भेट दिली. महायुती सरकारच्या निवडणुकी पूर्वी दिलेल्या फसव्या योजना, आश्वासने या विरोधात 'क्या हुवा तेरा वादा' या अनोख्या आंदोलना विषयी चर्चा केली.

महायुती सरकार स्थापने पूर्वी ज्या फसव्या योजना, आश्वासने जाहीर केली ती प्रखरतेने जनतेसमोर मांडा, गाव तांडा वस्ती वर जाऊन या सरकारचा खरा चेहरा जनतेला दाखवा असे आमदार कैलास पाटील म्हणाले. यावेळी त्यांनी शिवसैनिकांशी संवाद साधला. यावेळी त्यांचा सत्कार जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी केला, सोबत उपजिल्हाप्रमुख हनुमंत जगताप, राजु माहुवाले, सुशील पिंगळे, रवी वाघमारे, युवासेनेचे बबलु दिवे, नवनाथ प्रभाळे, प्रदीप कोटुळे, पंकज कुटे, गणेश लोणकर, सतीश परदेशीं, मारुती वाघचौरे अक्षय काशीद, रंगनाथ पैठणकर, नंदकुमार घोगरे, विशाल तांबे सह आदी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अवकाळी पावसाने कांदा सडला कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात

**असंवेदनशील कृषीमंत्री माणिकराव कोकाटे म्हणतात ढेकळाचे पंचनामे करायचे का? पंचनामे करायला प्रशासनाला वेळ नाही : डॉ.गणेश ढवळे**

**लिंबागणेश । प्रतिनिधी**



अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.साठवणुक केलेला आणि बाजारात विक्रीसाठी तयार कांदा वादळीवाऱ्यासह पाऊस आणि ढगाळ वातावरणामुळे जमिनीतील ओलावा वाढल्याने कांद्याच्या साठवणुकीवर परीणाम झाला असून कांद्याला ओल लागली आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना हा कांदा मिळेल त्या भावात विकावा लागणार आहे परीणामी शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला असुन तोंडचा घास हिरावला आहे.

आधीच कांद्याला भाव नाही आणि आता दुष्काळात तेरावा महिना म्हणल्याप्रमाणे अवकाळी पाऊस ; शेतकऱ्यांनी जगायचं कसं ? : कांदा उत्पादक शेतकरी कल्याण वाणी ( लिंबागणेश) ▶▶ उर्वरित पान २ वर

## आष्टी पं.स समितीचे मा. सभापती केशव गर्जे यांचे हृदय विकाराच्या झटक्याने निधन

**आष्टी । प्रतिनिधी**



थोर स्वातंत्र्य सैनिक स्व.राम राव गर्जे भाऊ यांचे कनिष्ठ चिरंजीव आष्टी पंचायत समितीचे माजी सभापती बापुराव उर्फ केशव राम राव गर्जे यांचे गुरुवार दि.५ जुन रोजी सायंकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने अहिल्यानगर येथील नोबेल हॉस्पिटलमध्ये निधन झाले. त्यांच्यापाठीमागे पत्नी माजी सभापती अंजली गर्जे,दोन मुले, खुशाल गर्जे हा एक भाऊ, पुतणे ,सुना असा मोठा परिवार आहे.पाटसरा येथे शुक्रवारी सकाळी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी अशोक गर्जे, दिलीपराव काळे, माजी सभापती लक्ष्मण नन्नवरे, ॲड. हनुमंत थोरवे, शिवाजी नाकाडे, चेअरमन आदिनाथ सानप, लालाभाऊ कुमकर, भाऊसाहेब लटपटे, संजय गाढवे, पांडुरंग नागरगोजे, माजी सभापती अनिल जायभाये, पत्रकार उत्तम बोडखे, वैजीनाथ मिसाळ, समाजसेवक विजय गोल्हार, देविदास धस, माजी आ. भीमराव धोंडे यांनी . ▶▶ उर्वरित पान २ वर

